# नियमित फौजदारी खटला क्र. ३०६/२०१५.

शासन विाा गजानन दिलीप जाधव व इतर.
CNR No.- MHST-0700-2893-2015.

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश

१. प्रस्तुत प्रकरणी आरोपी क्र.३ नामे संदीप बजरंग वडार रा.वडारगल्ली, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली हा गैरहजर असल्याने जामिनदार नामे मिथून रघुनाथ साळुंखे रा.मनु, ता.कराड, जि.सातारा यांना नोटीस काढून जामिनाची रक्कम रु.१५,०००/– का वसूल करु नयेत याबाबत म्हणणे दाखल करण्याकरिता सुचित केले होते. सदर नोटीस अहवाल नि.क्र.१९ वर दाखल असून सबंधित पोलिस यांनी बजावणी मुदतीत केल्याचे नमूद केले आहे. त्यावर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. संबंधित जामिनदार न्यायालयासमक्ष उपस्थीत राहिला नाही व त्याने म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे, संबंधित जामिनदाराची मौजे मनू, ता.कराड, जि.सातारा येथील शेत जमिन भुमापन क्र. १८८ या वर्णनाची स्थावर मालमत्ता जप्त करून व आवश्यक क्षेत्राची विक्री करून थकीत रक्कम रू.१५,०००/– वसुल होवून मिळणे आवश्यक आहे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३१ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ४७१) नुसार एखाद्या व्यक्तीस आदेशानुसार रक्कम येणे असल्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४२१ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ४६१) अन्वये ती रक्कम जणू काही द्रव्यदंड असल्याप्रमाणे वसूल करता येते. त्याकरीता न्यायालय कसूरदाराच्या स्थावर मालमत्तेतून ती रक्कम जमीन महसुलची थकबाकी म्हणून वसूल करण्यास त्या जिल्हाधिकाऱ्यास प्राधिकृत करणारे वॉरंट काढू शकते. सबब, मी न्यायाच्या दृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

## आदेश

१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३१ (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ४७१) अन्वये बॉड रक्कम रू.

१५,०००/– ही जामिनदाराच्या मौजे मनू, ता.कराड, जि.सातारा येथील शेत जमिन भुमापन क्र. १८८ या वर्णनाची मालमत्ता जप्त करुन त्यातून जमीन महसुलची थकबाकी म्हणून वसूल करण्याकरीता संबधीत जिल्हाधिकारी, सातारा यांना प्राधिकृत करणारे अधिपत्र जारी करण्यात यावे.

२) सदर मालमत्ता जप्त केलेबाबत महसूल अभिलेखामध्ये जप्ती दर्शविणारी योग्य ती नोंद करणेकरीता तसेच, पुढील कार्यवाही करिता या आदेशाची प्रत अधिपत्रासह संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावी.

३) संबधीत जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदर अधिपत्र कोणत्या रितीने व कोणत्या दिनांकास बजावले किंवा कसे, याबाबत सविस्तर अहवाल सादर करावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.02.25 17:03:40 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– २५/०२/२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग १, कराड.

(न्यायालय क्र.०५)